# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/283/2023-24

दि.09/05/2023

संगणक विभाग
आवक क्र: 923
दिनांक: 10/5/23

विषय :- "उपायुक्त" पदाच्या कार्यभाराबाबत.

संदर्भ :- जा.क्र.मनपा/सा.प्र.वि/08/2023-24, दि.06/04/2023 रोजीचा प्रत्यायोजन आदेश.

<u>सुधारित प्रत्यायोजन आदेश -</u>

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 49 अन्वये, विविध खात्यांचे व विभागांचे प्रशासन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या निरनिराळया प्रकरणात असलेल्या विविध तरतुदीखाली नमुद केलेले आयुक्तांचे अधिकार आणि कर्तव्ये, महानगरपालिका आयुक्तांचे सर्वसाधारण नियंत्रणसापेक्ष उपायुक्त यांचेकडे संदर्भिय आदेशान्वये सोपविण्यात आले होते. सदर आदेशात खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

अ) मारुती गायकवाड, उप-आयुक्त (मुख्यालय)

1) सामान्य प्रशासन विभाग/आस्थापना विभाग
2) निवडणूक व जनगणना विभाग
3) सुरक्षा विभाग
4) विधी व अभिलेख विभाग
5) वाहन विभाग व यांत्रिकी विभाग
6) अग्निशमन विभाग व आपत्ती व्यवस्थापन विभाग
7) अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग/ फेरीवाला धोरण, नियंत्रण
8) क्लस्टर डेव्हलपमेंट
9) स्थानिक संस्था कर विभाग

ब) संजय शिंदे, उप-आयुक्त

1) सार्वजनिक आरोग्य विभाग
2) माहिती व तंत्रज्ञान विभाग
3) ई-टेंडरिंग / सिसिटीव्ही यंत्रणा
4) माहिती जनसंपर्क विभाग
5) कर विभाग
6) परवाना विभाग
7) पर्यावरण विभाग
8) शिक्षण विभाग

क) रवि पवार, उप-आयुक्त

1) SBM, शासन निधी, दैनंदिन साफसफाई, नालेसफाई व C & D.
2) मध्यवर्ती भांडार विभाग
3) पशुवैद्यकीय विभाग

D/Nayna/बदलीव आदेश

ड) कल्पिता पिंपळे, उप-आयुक्त

1) घनकचरा व्यवस्थापन विभाग (प्रकल्प)
2) उद्यान विभाग
3) समाजविकास विभाग (NULM सह)
4) महिला व बालकल्याण विभाग
5) ग्रंथालय विभाग
6) पे ॲण्ड पार्क भुईभाडे
7) बाजार लिलाव
8) जाहिरात विभाग
9) क्रिडा विभाग

संबंधित उपायुक्त यांनी वरील विभागांचे कामकाज, वेळोवेळी त्यांना प्रत्यायोजित केलेल्या आयुक्तांच्या वित्तीय व प्रशासकीय अधिकाराच्या मर्यादेत राहून पहावयाचे आहे. वित्तीय बाबींशी निगडीत सर्व प्रस्ताव/प्रकरणे मंजुर करण्यापुर्वी मुख्यलेखाधिकारी व मुख्यलेखापरीक्षक यांची सहमती घ्यावी.

स्थायी समिती, महासभा अथवा केंद्र किंवा राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावयाचे सर्व प्रस्ताव अतिरिक्त आयुक्त व आयुक्तांच्या पुर्व मान्यतेने व मंजुरीनेच पाठविणे बंधनकारक राहिल.

वरीलप्रमाणे संबंधित विभागाचे कामकाज पाहत असताना महानगरपालिका उपायुक्तांनी आपल्या पदावधीत व त्य पदाच्या आधारे पार पडलेल्या व केलेल्या सर्व कृती व गोष्टी, ह्या सर्व प्रयोजनासाठी आयुक्तांनी पार पाडल्या आहेत व केल्या आहेत, असे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 49 नुसार मानले जाईल.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत,

1) अतिरिक्त आयुक्त (1/2)
2) उप-आयुक्त (सर्व)
3) मुख्यलेखापरीक्षक
4) मुख्यलेखाधिकारी
5) खातेप्रमुख/विभागप्रमुख (सर्व)
6) संगणक विभाग (संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता)
7) आस्थापना निवडनस्ती

D/Nayna/बदलीv3आदेश